आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ नोव्हेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- अयोध्येतल्या श्रीराममंदिरात धर्मध्वजारोहण सोहळा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न

- निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचे पालन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे सूचना

- संविधान दिनानिमित्त उद्या देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- डेफलिम्पिक्स नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताची १६ पदकांची कमाई

**आणि**

- आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर

**<><><><><>**

अयोध्येतल्या राममंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज या मंदिरावर धर्मध्वजारोहण झालं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… व्हीसी**

*(विवाह पंचमीच्या मुहुर्तावर होत असलेल्या धर्मध्वज सोहळ्यानिमित्त देशभरातून हजारो भाविक अयोध्यानगरीत जमले असून सर्वत्र जय श्रीरामचा जयघोष आणि शंखध्वनी ऐकू येत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी अयोध्येत रोड शो केला आणि राम मंदिर परिसरातल्या विविध मंदिरांना भेट देऊन तिथे पूजा केली. प्रधानमंत्र्यानी सप्तमंदिर, शेषावतार मंदिर तसंच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराला भेट दिली तसंच रामलल्लाच्या गर्भगृहात पूजा केली. त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत धर्म ध्वजारोहण झालं. उगवता सूर्य आणि कोविदार वृक्षासह ओम ची प्रतिमा असलेला हा भगवा ध्वज दहा फूट*

*उंच, वीस फूट लांब असून श्रीरामाचं शौर्य आणि अलौकिक तेजाचं प्रतीक मानला जात आहे.)*

धर्मध्वजारोहणाच्या या सोहळ्यानिमित्त आज संपूर्ण देश आज राममय झाला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. त्यांनी सर्वांना धर्मध्वज सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या. तसंच अयोध्येतल्या राममंदिराच्या निर्मितीसाठी योगदान दिलेल्यांचं याभिनंदन केलं. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह इतर मान्यवर आणि शेकडो भाविक यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी कुरुक्षेत्र इथं गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले. याप्रसंगी त्यांनी विशेष नाणं आणि टपाल तिकिटाचं अनावरण केलं. हरियाणाचे राज्यपाल असीम कुमार घोष, मुख्यमंत्री नायाबसिंह सैनी आणि हरियाणा शीख गुरुद्वारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश सिंग झिंडा यावेळी उपस्थित होते. गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त या वर्षी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

त्याआधी प्रधानमंत्री मोदी यांनी भगवान श्रीकृष्णाच्या शंखाच्या सन्मानार्थ पांचजन्य इमारतीचंही उद्घाटन केलं. तसंच श्रीमद्भगवत गीतेच्या उगमाशी संबंधित ब्रह्मसरोवर इथं पूजा केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज निवडणूक आयोगाला केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात

असल्याप्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली.

<><><><><>

नवी दिल्लीत संविधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात उद्या संविधान दिनाचा कार्यक्रम होणार आहे. भारताने १९४९ साली याच दिवशी राज्यघटनेचा स्वीकार केला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला तसंच संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य यात सहभागी होतील. या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नेतृत्वात राज्यघटनेच्या प्रस्तावनेचं वाचन केलं जाईल. तसंच ९ विविध भारतीय भाषांमधल्या राज्यघटनेच्या प्रतींचं आणि एका विशेष स्मरणिकेचं प्रकाशन होईल. संविधान दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रम होणार असून २६/११च्या मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्यांचं स्मरण करण्यात येईल.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नावाचं व्हाट्सएप खातं बनावट असल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे. व्हाट्सएप या समाजमाध्यमावर राष्ट्रपतींचं कोणतही अधिकृत खातं नसल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या सत्यशोधक पथकाने सांगितलं आहे. राष्ट्रपतींच्या अधिकृत समाजमाध्यम खात्यांच्या लिंक्स पत्र सूचना कार्यालयाने जाहीर केल्या असून नागरिकांनी बनावट खात्यांपासून सावध राहावं आणि केवळ अधिकृत स्रोतांचाच वापर करावा असं आवाहन केलं आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या बस्तर भागातील नारायणपूर इथं आज २८ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. या १९ महिलांचा समावेश आहे. या सर्वांवर एकूण ९ लाख रुपयांचं इनाम होतं. यातल्या तिघांनी एक एसएलआर, एक आयएनएसएएस आणि एक ३०३ रायफल पोलिसांकडे सुपूर्द केली. बस्तरमधे शांतता प्रस्थापित

करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. या वर्षभरात नारायणपूर जिल्ह्यात २८७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

टोक्यो इथं झालेल्या डेफलिम्पिक्स नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं यंदा १६ पदकांची चमकदार कामगिरी केली. यात ७ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्यपदकांचा समावेश आहे. १० दिवस चाललेल्या या स्पर्धेत एकंदर ३९ पदकांपैकी १६ पदकं भारतानं पटकावली. रायफल नेमबाज महित संधू हिनं २ सुवर्ण आणि २ रौप्यपदकांवर नाव कोरलं. तर पिस्तूल नेमबाज अभिनव देशवाल आणि प्रांजली धुमाळ यांनी दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक पटकावलं. इतर नेमबाजांनीही उत्तम कामगिरी करत भारताला पदकांची कमाई करून दिली.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा २०२६, ७ फेब्रुवारी ते ८ मार्चदरम्यान होणार आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांनी आज या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं. भारतात पाच ठिकाणी, तर श्रीलंकेत ३ ठिकाणी या स्पर्धेचे सामने होतील. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांचा समावेश, अमेरिका, नेदरलँड्स आणि नामिबियासह अ गटात करण्यात आला आहे. भारतीय फलंदाज रोहित शर्मा या स्पर्धेचा ब्रँड ॲम्बॅसिडर असेल.

**<><><><><>**

गुवाहाटी इथं बारसापारा स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरु असलेल्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशीचा खेळ आज संपला तेव्हा भारताच्या २ बाद २७ धावा झाल्या होत्या. सलामीचे फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि के एल राहुल बाद  झाल्यानंतर मैदानात आलेले साई सुदर्शन २ धावांवर आणि कुलदीप यादव ४ धावांवर खेळत होते. याआधी दक्षिण

आफ्रिकेने ५ बाद २६० धावांवर डाव घोषित केला होता. त्यामुळे आता सामना जिंकण्यासाठी भारतासमोर ५४९ धावांचं आव्हान आहे. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेनं ४८९ धावा तर भारताने २०१ धावा केल्या होत्या.

**<><><><>**

५६वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आजच्या सहाव्या दिवशी विविध जागतिक चित्रपट, मास्टरक्लासेस यासह विविध कार्यक्रमांची मेजवानी सिनेरसिकांना मिळत आहे. ‘माय फादर्स शॅडो’ हा नायजेरियन चित्रपट, ‘जॅनिटर’ हा मेक्सिकन चित्रपट आणि ‘एलेफंट मेमरी’ हा ब्राझिलियन चित्रपट आज या महोत्सवात दाखवण्यात आला. तसंच ‘के पॉपर’ हा इराणी चित्रपट आणि ‘इट्स अ सॅड अँड ब्यूटिफुल वर्ल्ड’ या कतारी चित्रपटाचा आस्वादही सिनेरसिकांनी घेतला. ऑस्कर पुरस्कार विजेते ख्रिस्तोफर चार्ल्स कोरबोल्ड यांनी साहसदृश्यं, स्पेशल इफेक्ट्स याबद्दल मास्टरक्लास घेतला. कृत्रिम बुद्धिमत्ता हे चित्रपटनिर्मितीचं सर्वात लोकशाही-अभिमुख माध्यम असल्याचं प्रतिपादन प्रसिद्ध निर्माते शेखर कपूर यांनी केलं. दिवंगत अभिनेता धर्मेंद्र यांना आज इफ्फीत आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत सायप्रसच्या संसद अध्यक्ष अनिता डेमेट्रिय यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही देशांमधील द्विपक्षीय सहकार्य, परस्पर सार्वभौमत्वाचा आदर तसेच दहशतवाद आणि मूलतत्त्ववादाला ठाम विरोध या मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सायप्रस ला लवकरच युरोपियन युनियन परिषदेचं अध्यक्षपद मिळणार आहे आणि त्या पार्श्वभूमीवर या भेटीमुळे भारत आणि युरोपियन युनियन मधील संबंध अधिक बळकट होतील, असा विश्वास जयशंकर यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

जगात दर १० मिनिटांनी एक महिला किंवा मुलीची हत्या होत असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात म्हटलं आहे. आजचा दिवस महिलांवरच्या अत्याचाराचं निर्मूलन करण्यासाठी घोषित केलेला जागतिक दिन असून त्यानिमित्त हा अहवाल प्रकाशित केला आहे. २०२४ या वर्षात जगभरात सुमारे ८३ हजार महिला किंवा मुलींची हत्या करण्यात आली. त्यातल्या ६० टक्के आपल्याच कुटुंबियांच्या हल्ल्याला बळी पडल्या. तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर पाळत, धमक्या देणं, चित्रांचा वापर करून छळणं अशा प्रकारचा हिंसाचार वाढला असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**